करोना2020/सूचनां/आदेश क्र. १६१


**महाराष्ट्र शासन**

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय रायगड-अलिबाग**

**दुरध्वनी क्रमांक** :- 02141-222118/222097/222001 **फॅक्स क्रमांक**: 02141-222025/227451

Email : collector_raigad@maharshtra.gov.in Email dcraigad@gmail.com


---

क्र.साशा/कार्या-1/ब-5/आ.व्य./कोरोनाविषाणू/प्रतिबंधात्मक उपाययोजना/2020 दि. ०१ /04/2020

---

प्रति,

अधिक्षक, डाकघर

रायगड विभाग,

ता. अलिबाग, जि. रायगड

विषय :- पोस्ट विभागामार्फत सेवा पुरविणेबाबत.

संदर्भ :- आपले कार्यालयाकडील पत्र क्र. DO No SP -1/COVID -19/ 2019-20, दिनांक 30/03/2020

राज्य शासनाने कोरोना विषाणुचा (COVID-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिंबधात्मक कायदा 1897, दिनांक 13/03/2020 लागु केला आहे. दिनांक 24/03/2020 रोजी मध्यरात्रीपासुन दिनांक 14/04/2020 संपुर्ण देशात संचारबंदी लागु करण्याचे मा. प्रधानमंत्री महोदयांनी घोषीत केले आहे. तथापी सदर कालावधीत अत्याआवश्यक सेवा, जिवनावश्यक वस्तुचा पुरवठा व स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या सेवा सुरु राहणार आहे. तसेच या कालावधीत डाक विभागाकडुन पोस्ट खात्याच्या वैयक्तीक लाभार्थीना त्यांच्या घरोघरी जावुन त्यांच्या खात्यामधुन रक्कम काढण्याची सुविधा पोस्ट खात्यामार्फत सुरु करण्यांत आलेली आहे असे उपरोक्त संदर्भिय पत्राद्वारे या कार्यालयास कळविले आहे.

रायगड जिल्हामध्ये 45 सब पोस्ट ऑफिसेस व 286 शाखा पोस्ट ऑफिसेस नागरी व ग्रामीण भागामध्ये कार्यरत असुन 510 पोस्टमास्टर्स / सबपोस्टमास्टर्स/ पोस्टमन / ग्रामीण डाक सेवक इतक्या कर्मचारी वर्गामार्फत नागरीकांना विशेष सेवा पुरविण्यांत येत आहेत, असेही नमुद आहे.

आधार इनेबल पेमेंट सविसेसे (AEPS) या योजने मार्फत कोणताही मोबदला न घेता इतर कोणत्याही बॅकेतील रक्कम काढण्याची सुविधा घरोघरी देण्याची व्यवस्था पोस्ट खात्यामार्फत देण्यात येणार आहे व आधार इनेबल पेमेंट सर्व्हिसेस (AEPS) या योजनेचा लाभ घेण्याचा झाल्यास डाक विभागकडुन नेमणुक करण्यांत आलेल्या 57 पथकामधील कर्मचारी (पोस्टमन/ ग्रामीण डक सेवक ) यांचे मोबाईल क्रमांकवर फोन करण्यांत आलेनंतर त्यांचे मार्फत संबधीत खातेदाराच्या घरी जाऊन कोणत्याही बॅक खात्यामधील रक्कम काढण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यांत येईल. असे आपले कडील संदर्भिय पत्रान्वये कळविले आहे.

मात्र, सदर योजनेचा लाभ देण्यासाठी संबधीत खातेदारांना आधार इनेबल पेमेंट सर्व्हिसेस (AEPS) प्रणालीचा वापर करण्यांत येणार असल्यास यामध्ये ग्राहकांचा अंगठा लागणार आहे किंवा कसे? ते तात्काळ या कार्यालयास कळवावे. तसेच कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सध्यस्थितीत जिल्ह्यात बायोमेट्रीक प्रणाली बंद आहे. सबब, आपली आधार इनेबल पेमेंट सर्व्हिसेस (AEPS) प्रणालीची कार्यप्रणाली या कार्यालयास कळविल्यास पुढील उचित निर्णय घेता येईल.

(निधी चौधरी)

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**

**रायगड-अलिबाग**